दावा दाखल ता. १०/०३/२०२६

दावा फैलावर ता. १०/०३/२०२६

दावा निकाल ता. १४/०३/२०२६

रे.क.नं २९/२०२६

तडजोड हुकुमनामा

निशाण क्रं ४-११/अ

# मे.दिवाणी न्यायालय क स्तर पन्हाळा

## यांचे कोर्टात .............

**विकास सदाशिव तेली (फल्ले)**
व.व. ४४, धंदा- शेती,
रा. बुधवारपेठ ता. पन्हाळा
जि.कोल्हापूर
} वादी

विरुद्ध ..............

| | |
|---|---|
| **१. आनंदा सदाशिव तेली (फल्ले)**<br>व.व. ५१, धंदा- शेती,<br>रा.बुधवारपेठ ता. पन्हाळा,<br>जिल्हा कोल्हापूर | **प्र.वादी** |

**दावा :-**

**हिंदु वारसा कायदा कलम ६ व ८ प्रमाणे दावा वाटप होवुन मिळणेसाठी व सरस निरस मानाने तुटक कब्जा होवुन मिळणेसाठी कोर्ट फी व ज्युरीसडीक्शन साठी दावेची रक्कम ४७ रू ६० पैसे रू वर स्टँप सदरी दाखल**

**<u>यातील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते खालीलप्रमाणे:-</u>**

**१) दावा मिळकतीचे वर्णन :-**

अ) मौजे आंबवडे ता. पन्हाळा जिल्हा कोल्हापुर हद्दीतील गट नं ४७१ चे एकुण क्षेत्र ० हे ६७ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०४ आर पोट खराब सह क्षेत्र ००हे ७१ आर आकार ० रू ४१ पैसे पैकी वादी व प्र.वादी यांचे हीस्सेचे क्षेत्र ० हे ५५.८३ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०३ आर पोट खराब सह एकूण क्षेत्र ००हे ५८.८३ आर आकार ०० रू ३४ पैसे ची शेत मिळकत येणे प्रमाणे मिळकत ही या दावेचा विषय असून,सदर शेत मिळकती या वादी व प्र.वादी यांच्या मालकी

वहीवाटीची असुन सदर मिळकतीमध्ये वादी यांचा १/२ हीस्सा असुन तो सरस निरस मानाने वाटप होऊन तुटक कब्जा मिळणे हा या दावेचा विषय होय.

२) यातील वादी व प्र.वादी नं १ यांचे पुर्वहक्कदार सदाशिव रामचंद्र तेली यांची होती.सदर सदाशिव रामचंद्र तेली हे सन २००६ दरम्यान मयत झाले नंतर सदर दावा मिळकतीस वादी प्र. वादी तसेच मुली अनुक्रमे माधुरी शंकर तेली व सुनीता आनंदा फल्ले यांचे नावे नोंद झाली. सदर माधुरी व सुनीता यांनी रजिस्टर दस्त नं. ५८५६/२०२५ ने आपला हक्क वादी व प्र.वादी यांचे हक्कात हक्कसोड पत्राने सोडून दिलेला आहे. तसेच यातील सह हिस्सेदार सुशीला बापू तेली, पूनम विजय विभूते व कोंडीराम बापू फल्ले तेली यांचे हिस्सेचे विभाजन या पूर्वी वादी व प्र.वादी यांचे पूर्व हक्कदार यांचे मध्ये वाटप करून त्यांचे नावाचे क्षेत्र विभक्त झालेले असून त्यांची स्वतंत्र नोंद ७/१२ पत्रकी झालेली आहे. व त्यांची सदर दावा मिळकत मध्ये स्वतंत्र कब्जा असलेने व त्याबद्दल कोणताही वाद नसलेने सदर क्षेत्र सदर दावेत वगळून सदर दावा दाखल केला आहे. सदर वादी व प्र.वादी दावा मिळकतीचे सरळ व कायदेशीर वारस आहेत. सदर मिळकती मध्ये वादीचा १/२ हिस्सा असून तो विभक्त होवून मिळनेसाठी म्हणून वादी यांनी प्र.वादी यांचे कडे विभक्त करून मागितला असता प्र.वादी यांनी आज देतो उद्या देतो असे सांगून हिस्सा विभक्त करून देनेस टाळाटाळ केली दी. २५/०१ /२०२६ रोजी यातील वादी यांनी प्र.वादी यास प्रत्यक्ष भेटून सदर दावा मिळकतीचे सरस नीरस मानाने वाटप करून मागितले असता. प्र.वादी यांनी सदर दावा मिळकतीचे आम्ही वाटणी करणार नाही तू अशी

वाटणी पुन्हा मागितलेस त्याचे परिणाम चांगले होणार नाहीत. असे संगितले व वाटणी करनेस नकार दिला प्र.वादी हे अडदांड इसम असून ते बोलतील तसे वागतील याची पूर्ण खात्री व हमी वादीस असलेने यातील वादी यांनी प्र.वादी यांचेकडे वर नमुद केले प्रमाणे दावा मिळकती मध्ये असणारा त्यांचा १/२ हीस्सेचे क्षेत्र विभक्त करून मिळनेसाठी सदर दावा मिळकतीचे निरस मानाने तुटक कब्जा होऊन वाटप होणेसाठी म्हणुन प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असुन तो मंजुर होणेस पात्र असा आहे.

३) **दाव्यास कारण :-**

यातील वादी यांनी प्र.वादी यांना दावा मिळकत ही विभक्त आणेवारी ची असुन वादी यांनी प्र.वादी यांचेकडे दि. २५/०१/२०२६ इ रोजी आपल्या हीस्सेस येणारे क्षेत्र सरस निरस मानाने वाटपकरून तुटक कब्जा घेणेसाठी म्हणुन मागणी केली असता त्यांनी त्यास नकार दिला असलेने दावेस कारण घडले असुन ते आज अखेर घडत आले आहे.

४) **दाव्याचा तपशील**

| **रूपये** | **पैसे** | **तपशील** |
|---|---|---|
| **१३ रू** | **६० पैसे** | **दावा मिळकत ही शेत मिळकत असुन त्यामध्ये वादीचा १/२ हीस्सा असुन त्याचा आकार ०० रू ३४ पैसे इतका असुन त्यामध्ये वादीचा येणारा १/२ हीस्सा नुसार येणारा** |

**आकार ०० रू १७ पैसे त्याच्या ८० पट रक्कम**

**म्हणजेच १३ रू ६० पैसे रू सदरी दाखल.**

| | |
|---|---|
| **१३ रू ६०पैसे / -** | **एकूण** |

५) **दाव्याची आकारणी :-**

दावा मिळकत ही शेत मिळकत असुन त्यामध्ये वादी च्या हीस्सेस येणारा आकार हा ००रू १७ पैसे असुन त्यावर आकाराच्या २०० पट म्हणजेच रु. ३४ रू ०० पैसे झाली असून यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दाव्यासोबत जोडला आहे.

६) दावा मिळकत मे कोर्टाच्या स्थल सिमेत येत आहे. तसेच वादी व प्रतिवादी हे मे कोर्टाच्या अधीकार क्षेत्रात राहत आहेत परीणामी में कोर्टास सदर दावा चालविणेचा व निर्गत करणेचा पूर्ण हक्क् व अधिकार आहे.

७) सदर दावेस मुदतीची बाधा येत नाही.

८) सदर वादी व प्र.वादी यांच्या दरम्यान सदर दावा मिळकती बाबत अन्य कोणत्याही न्यायालयात वाद प्रकरण दाखल अथवा प्रलंबीत अथवा निकाली झालेले नाही.

९) **सबब वादींची विनंती की,**

अ) वादीचा दावा खर्चासह मंजूर व्हावा.

ब) दावा मिळकती चे सरस – निरस मानाने वाटप होऊन वादीचा १/२ हिस्सा अगर कायदयाने ठरेल तो हीस्सा तुटक करून वादीच्या ताब्यात मिळावा.

क) वाद मिळकतीचे वाटप मे जिल्हा अधिकारी साहेब यांचे मार्फत करणेत यावे व वाद मिळकतीचा तुटक कब्जा वादींना देवे - विण्यात यावा.

इ) जरूर तर दावा दुरुस्तीस परवानगी असावी.

उ) इतर योग्य ते न्यायाचे हुकुम वादींच्या वतीने करावेत ही विनंती.

आज दि. १४/०३/२०२६ इ. रोजी राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मा. श्रीमती एस.व्ही. जंगमस्वामी, पॅनेल प्रमुख तथा दिवाणी न्यायाधिशसो, क. स्तर पन्हाळा यांचेसमोर तसेच वादी व तर्फे वकील एम एन डवंग व प्र.वादी व तर्फे वकील प्र.प्र .पाटील यांचे समक्ष नि.९ वरील तडजोड पुरसीस नुसार सदरचा दावा तडजोडीने अंतिम निकालात निघाला

**<u>यातील वादी व प्र.वादी यांच्या दरम्यान आपआपसातील तडजोड पुरसीस खालील प्रमाणे</u>**

यातील वादी व प्र.वादी हे सदर दावा मिळकत मध्ये सहहीस्सेदार आहेत ही बाब वादी व प्र.वादी यास मान्य व कबुल आहे.तसेच यातील वादी व प्र.वादी **यांची दावा मिळकत ही वडीलोपार्जीत आहे. हे वादी व प्र.वादी नं १ ते २ यास मान्य व कबुल आहे.** त्यानुसार त्यानी खालील अटी व शर्तीने सदर वाद मिळकती बद्यल आपला दावा (वाद) तडजोडीने मिटवला असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे

वादीने दावेत कथन केले प्रमाणे वादीचा व प्र.वादी यांनी दावा मौजे आंबवडे ता. पन्हाळा जिल्हा कोल्हापुर हद्यीतील गट नं ४७१ चे एकुण क्षेत्र ० हे ६७ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०४ आर पोट खराब सह क्षेत्र ००हे ७१ आर आकार ० रू ४१ पैसे पैकी वादी व प्र.वादी

यांचे हीस्सेचे क्षेत्र ० हे ५५.८३ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०३ आर पोट खराब सह एकूण क्षेत्र ००हे ५८.८३ आर आकार ०० रू ३४ पैसे ची शेत मिळकत येणे प्रमाणे मिळकत ही या दावेचा विषय असून,सदर शेत मिळकती ही दावा मिळकत योग्य व बरोबर आहे.

अ) **मौजे आंबवडे ता. पन्हाळा जिल्हा कोल्हापुर हद्यीतील याचा गट नं ४७१ चे एकुण क्षेत्र ० हे ५५.८३ आर पोट खराब ० हे ०३ आर पोट खराबसह चे एकुण क्षेत्र ० हे ५८.८३ आर आकार ० रू ३४ पैसे ची मिळकत** ही दावा मिळकत योग्य व बरोबर आहे.

आ) वादीने दावेत कथन केले प्रमाणे वादीचा व प्र.वादी यांनी दावा मिळकती मध्ये १/२ हीस्सा आहे ही बाब वादी व प्र.वादीस मान्य व कबुल आहे.

इ) यातील दावा मिळकत **मौजे आंबवडे ता. पन्हाळा जिल्हा कोल्हापुर हद्यीतील याचा गट नं ४७१ चे** ० हे ६७ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०४ आर पोट खराब सह क्षेत्र ००हे ७१ आर आकार ० रू ४१ पैसे पैकी वादी व प्र.वादी यांचे हीस्सेचे क्षेत्र ० हे ५५.८३ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०३ आर पोट खराब सह एकूण क्षेत्र ००हे ५८.८३ आर आकार ०० रू ३४ पैसे ची शेत मिळकत यातील वादी **विकास सदाशिव तेली (फल्ले) यांना १/२ हीस्सेने म्हणजेच** ० हे २७.९१ आर पोट खराब क्षेत्र ० हे ०१.५ आर पोट खराबसहचे एकुण क्षेत्र ० हे २९.४१ आर आकार ० रू १७ पैसे देणेचे ठरले असुन त्याच्या चतुसिमा पुर्वेस : सर्जेराव संकपाळ यांची मिळकत पश्चीम : रस्ता दक्षीणेस : सदर मिळकतीमधील कोंडीराम बापु फल्ले तेली वगैरे यांची मिळकत उत्तर : प्रतिवादी **आनंदा सदाशिव तेली (फल्ले)** यांची मिळकत या चतु:सिमे तील क्षेत्र या तडजोडी मध्ये देणेचे मान्य व कबुल केलेले आहे. या तडजोडी मध्ये देणेचे मान्य व कबुल केलेले आहे.

ई) यातील दावा मिळकत **मौजे आंबवडे ता. पन्हाळा जिल्हा कोल्हापुर हद्यीतील याचा गट नं ४७१ चे** ० हे ६७ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०४ आर पोट खराब सह क्षेत्र ००हे ७१ आर आकार ० रू ४१ पैसे पैकी वादी व प्र.वादी यांचे हीस्सेचे क्षेत्र ० हे ५५.८३ आर पोट खराब क्षेत्र ००हे ०३ आर पोट खराब सह एकूण क्षेत्र ००हे ५८.८३ आर आकार ०० रू ३४ पैसे ची शेत मिळकत यातील प्र.वादी **आनंदा सदाशिव तेली (फल्ले)** यांना १/२ हीस्सेने म्हणजेच ० हे २७.९२ आर पोट खराब क्षेत्र ० हे ०१.५ आर पोट खराबसहचे एकुण क्षेत्र ० हे २९.४२ आर आकार ० रू १७ पैसे देणेचे ठरले असुन त्याच्या चतुसिमा पुर्वेस : सर्जेराव संकपाळ यांची मिळकत पश्चीम : रस्ता दक्षीणेस : वादी **विकास सदाशिव तेली (फल्ले)** यांची मिळकत यांची मिळकत उत्तर : पंडीत सुर्वे व निवृत्ती सुर्वे वगैरे यांची मिळकत या चतु:सिमे तील क्षेत्र या तडजोडी मध्ये देणेचे मान्य व कबुल केलेले आहे. या तडजोडी मध्ये देणेचे मान्य व कबुल केलेले आहे.

उ) सदर तडजोड हुकुम नाम्याने देय केलेल्या मिळकती मध्ये वादी व प्र.वादी यांनी कब्जे वहीवाट करणेची असुन एकमेकास अडचण अडथळा व त्रास होईल असे कोंणतेही कृत्य करणेचे नाही.

ऊ) भविष्यात सदर मिळकतीचे विभाजन करुन विभक्त ७/१२ करणेचा असलेस अथवा सदर सदर मिळकतीची महसुल कार्यालयात नोंद करणेची असलेस त्यास वादी व .प्र.वादी यांनी सहकार्य करणेचे असुन असे सहकार्य या तडजोड हकुम नाम्याने दीले आहे. असे समजणेस वादी व प्र.वादी.यांची कोणतही हरकत व अडथळा नाही. वा असे सहकार्य वा आवश्यकता असलेली संमती या हुकुमनाम्याने वादी व .प्र.वादी एकमेकास दीलेली आहे.

ऋ) यातील वादी व प्र.वादी यांनी येथुन पुढे ठरलेल्या प्रमाणे मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा घेऊन सदर मिळकतीमध्ये वहीवाट करणेची असुन सदर मिळकतीचा उपभोग व अन्य गोष्टी हा जेच्या

तेच्या ईच्छेप्रमाणे करणेचे आहेत. तसेच सदर मिळतीची विल्लेवाट अथवा हस्तातरण करणेस यातील वादी व प्र.वादी यांनी एकमेंकास मान्यता दीली असुन अन्य कोणतीही स्वतंत्र मान्यता घेणेची आवश्यकता नसुन ती या तडजोड हुकुम नाम्याने दीली असे समजणेत येईल.

## खर्चाचा आकडा

नियमीत दिवाणी दावा नं. २९/२०२६ मधील नि.११/अ सोबत

| अ.नं. | तपशिल | वादी | प्रतिवादी |
|---|---|---|---|
| १ | दावा अर्जास मुद्रांक | २०० | -- |
| २ | वकील पत्रास मुद्रांक | १० | १० |
| ३ | वकील फी | १५० | १५० |
| ४ | दाखल केलेल्या कागदास मुद्रांक | १५ | ०५ |
| ५ | आदेशिका लागू करणेस मुद्रांक | -- | -- |
| ६ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ७ | मनाई अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| ८ | कमिशनरची फी | -- | -- |
| ९ | साक्षीदारास भत्ता | -- | -- |
| १० | इतर अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| | एकूण ... | ३७५ | |
| | वजा न दिलेला खर्च | | |
| १ | मुदत अर्जास स्टॅम्प | -- | -- |
| २ | कोर्ट फी परतावा | २०० | -- |
| | एकूण ..... | १७५ | १६५ |

आज दिनांक १४ माहे मार्च सन २०२६ इसवी रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

CIVIL JUDGE J.D. PANHALA

( एस.व्ही.जंगमस्वामी.)
पॅनेल प्रमुख, राष्ट्रीय लोकन्यायालय ,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर पन्हाळा

क. लिपिक

वादी तर्फे वकील – एम.एन.डवंग

प्रतिवादी तर्फे वकिल – प्रतिक पाटील

<u>टीप - या वादातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र ठरतील)</u>